पुणे महानगरपालिका, क्षेत्रिय आयुक्त परिमंडळ क्र.२ कार्यालय
पं.ज.नेहरू सांस्कृतिक भवन, घोलेरोड, शिवाजीनगर, पुणे ४११००५
जा. क्र. क्षेआप २/५९७८ दिनांक ०५/०३/२०२१

# कार्यालय परिपत्रक

**विषय** : शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्त होणाऱ्या निःसमर्थ/दिव्यांग (मुकबधिर, अस्थिव्यंग व अंध) कर्मचाऱ्यांना त्यांची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडण्यासाठी आवश्यक सहाय्यक तंत्रज्ञान/उपकरणे उपलब्ध करून देणेबाबत.

पुणे महानगरपालिका मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १९७८ दि. २२.१२.२०११ अन्वये अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत पुणे मनपा आस्थापनेवरील शेड्यूलमान्य पदावर कार्यरत निःसमर्थ/दिव्यांग (मुकबधिर, अस्थिव्यंग व अंध) कर्मचाऱ्यांना त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यक सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत कायमस्वरुपी खर्चास मान्यता प्राप्त आहे.

पुणे मनपातील निःसमर्थ/दिव्यांग कर्मचाऱ्यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे की, यापूर्वी या योजनेचा लाभ न घेतलेल्या सेवकांनी विषयांकित अन्वये हव्या असणाऱ्या उपकरणाबाबत लेखी मागणी करतांना सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्याचा वापर करावा व त्यात नमूद आवश्यक सहाय्यक दस्तऐवज जोडून तो अर्ज दि.१५ मार्च २०२१ अखेर परिमंडळ क्र.२ कार्यालयात सादर करावा.

सदर कार्यालयीन परिपत्रकाची समज सर्व विभागांनी त्यांचेकडे कार्यरत असणाऱ्या निःसमर्थ/दिव्यांग सेवकांना द्यावी ही विनंती.

(नितीन उदास)
नोडल ऑफिसर (दिव्यांग) *तथा*
उप आयुक्त (परिमंडळ क्र.२)
पुणे महानगरपालिका

**प्रत अवलोकनार्थ व माहितीसाठी :**

मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
मा.अति.महापालिका आयुक्त (ज/इ/वि), पुणे महानगरपालिका

**प्रत अंमलबजावणी साठी सर्व खातेप्रमुख व**

मा.उप आयुक्त (परिमंडळ १ ते ५)
महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय क्र.१ ते १५)

**पुणे महानगरपालिका**

**शासकिय सेवेतील निःसमर्थ व्यक्तींसाठी सहाय्यक उपकरणे –तंत्रज्ञान**

**मागणी / नाकारणे अर्ज**

**दिनांक :**

मा. नोडल ऑफिसर (निःसमर्थ व्यक्ती) *तथा* उप आयुक्त (परिमंडळ २)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस...

संदर्भः १) मा. सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. न्यायाम – २०११/ प्रक्र ४/सुधार – ३ दि. ३०/०६/२०११, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

२) कार्यालयीन आदेश मआ/उआ/ से/ २०९९, दि. ४/८/२०११.

कारणे विनंती अर्ज करितो/करिते की,

मी नाव/हुद्दा : ...............................................................................

कार्यालय संपर्क क्र. ..................... व भ्रमणध्वनी क्रमांक ......................

................................................... कार्यालयात काम करीत आहे.

मी अस्थिव्यंग/अल्पदृष्टी/अंध/कर्णबधिर/मूकबधिर असून जिल्हाशल्य चिकित्सक यांचा याबाबत दिलेला दाखला सोबत जोडला आहे. डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे सोबत डॉक्टरांचे सर्टिफिकेट जोडल्यानुसार/ सहाय्यक उपकरणे –तंत्रज्ञान याची मला आवश्यकता आहे/नाही.

तरी, उपरोक्तनुरुप सहाय्यक उपकरणे –तंत्रज्ञान मला सध्या उपलब्ध करुन देणेस विनंती आहे/नाही.

| | |
|---|---|
| मागणी असल्यास सहाय्यक उपकरणे /तंत्रज्ञानाचा सविस्तर तपशील | |

मा.स. कळावे.

आपला /आपली विश्वासू,

**सोबतः १. वेतन चिठ्ठी झेरॉक्स, २. अपंगत्वाचा दाखला, ३. उपकरणाचे तांत्रिक माहिती (डॉक्टरांचे सर्टिफिकेट)**
**४. ॲटॅचमेंट व्हीलसह दुचाकी वाहना करीता ड्रायव्हींग फिटनेस सर्टिफिकेट.५.मागणी साहित्याच्या उत्पादक कंपनीचे दरपत्रक**

टिप : प्रत्येक उपकरणे/तंत्रज्ञानाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावा.